रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
## माजी विद्यार्थी समिती
## 2022-23
## वार्षिक अहवाल

महाविद्यालयाच्या विकासामध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे आहे याची प्रचीती आम्हाला वेळोवेळी आलेली आहे व येत आहे.

महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी बाहेर पडतो व काही वर्षानंतर तो नोकरीमध्ये, व्यवसायात, राजकारणात, समाजकारणात, विविध संघटनात कार्यरत असतो. सदर कामामध्ये व्यस्त असतानाही त्याला आपल्या महाविद्यालयाशी प्रेम, आदर, आपुलकी असतेच तसेच महाविद्यालयालाही सदर विद्यार्थी कोठे आहेत, कोणत्या क्षेत्रात आहेत याची जिज्ञासा असते म्हणूनच महाविद्यालयामध्ये दर वर्षी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

दि. 24/05/2023 रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने 70 माजी विद्यार्थी उपस्थित होते.

माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

मेळाव्यासाठी उपस्थित असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे.के.बापू जाधव यांनी मार्गदर्शन केले . व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या उपप्राचार्य डॉ.के. बी. भोसले यांनी मार्गदर्शन केले. डॉ. यु.व्ही.पाटील यांनी NAAC बदल माहिती सांगितली. महाविद्यालयाच्या विकासाची, प्रगतीची, नवनवीन प्रकल्पाची माहिती दिली यावर माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. माजी विद्यार्थीनी मनोगत व्यक्त केले.

माजी विदयार्थी महाविद्यालयास नेहमीच विविध प्रकारे मार्गदर्शन करीत असतात .

वर्ष भर माजी विद्यार्थी समितीतील सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी. एस. भोसले साहेबांचे मार्गदर्शन व कमिटी सदस्यांचे सहकार्य लाभले.

SSDaunde

प्रा. संदेश दौंडे
माजी विदयार्थी समिती प्रमुख

DR. PATANGRAO KADAM MAHAVIDYALAYA ... NANDNAGAR (BURLI)

Principal,
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)
Tal. Palus, Dist. Sangli.

Scanned with CamScanner